BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

मराठवाड्याच्या आर्थिक विकासात पर्यटन क्षेत्राचे योगदान- एक अभ्यास

डॉ. बाबासाहेब वाघ

संशोधक ,अर्थशास्त्र विभाग

जे.ई.एस. महाविद्यालय, जालना. संशोधक

डॉ.एम.जी.हिंगे

अर्थशास्त्र विभाग

जे.ई.एस. महाविद्यालय, जालना.

Email : hinge.mg@gmail.com

Abstract – सारांश

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश मराठवाडा प्रदेशाच्या आर्थिक विकासात पर्यटन क्षेत्राचे योगदान अभ्यासणे हा आहे. मराठवाडा हा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक वारशाने समृद्ध प्रदेश असून येथे अजिंठा लेणी, दौलताबाद किल्ला, बीबी का मकबरा, तुळजाभवानी मंदिर, तख्त सचखंड गुरुद्वारा, औंढा नागनाथ मंदिर आणि माहूरची रेणुकामाता यांसारखी महत्त्वाची पर्यटनस्थळे आहेत. पर्यटनामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती, व्यापार व लघुउद्योगांना चालना, स्थानिक उत्पादनांची विक्री, पायाभूत सुविधांचा विकास आणि सांस्कृतिक वारशाचे संवर्धन होण्याची शक्यता आहे. या अभ्यासात प्राथमिक व दुय्यम साधनसामग्रीचा वापर प्रस्तावित असून मुलाखत-अनुसूची तसेच प्रकाशित-अप्रकाशित संशोधन, पुस्तके, शासकीय प्रकाशने आणि लेख यांचा आधार घेण्यात येणार आहे. उपलब्ध संशोधन आराखड्यानुसार पर्यटनाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास करून मराठवाड्यातील पर्यटन विकासासाठी उपाय सुचविणे अपेक्षित आहे

Keywords – प्रमुख शब्द मराठवाडा, पर्यटन, आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती, स्थानिक व्यापार, सांस्कृतिक वारसा, पर्यटन धोरण, शाश्वत पर्यटन.

प्रस्तावना

पर्यटन म्हणजे प्रवास इंग्रजी भाषेतील टुरिझम या संज्ञेचा हा पर्याय आहे. इंग्रजी भाषेतील टुरिझम म्हणजे पर्यटक ही संज्ञा (ट्रॅव्हलर) प्रवासी या शब्दाऐवजी एकोणिसाव्या शतकारंभी वापरण्यात येऊ लागली. आधुनिक काळात पर्यटन हा एक स्वतंत्र राष्ट्रीय उद्योग म्हणून विकसित झाल्याचे दिसून येते. देशातील व परदेशातील पुराणवास्तू, इतिहास प्रसिद्ध व निसर्गरम्य स्थळे, प्राचीन कलानिर्मितीची केंद्र पवित्र तिर्थक्षेत्रे प्रचंड औद्योगिक व इतर प्रकल्प इत्यादींचे आकर्षण ही पर्यटना मागील मुळ प्रेरणा होय. ही प्रेरणा सार्वत्रिक व सर्वकालीन असली तरी आधुनिक काळातील ज्ञान प्रसाराची व दळणवळणाची सुलभ साधने विकसित झाल्याने आधुनिक पर्यटन उद्योगास चालना मिळाली. निसर्गनिर्मित व मानवनिर्मित रम्य व भव्य असे जे इहलोकीचे जे सौंदर्य आहे त्याविषयीची खास आस्था हा आधुनिक माणसाचा धर्म आहे. आनंदासाठी प्रवास करणे म्हणजे पर्यटन असाही अर्थ घेतला जातो. जागतिक पर्यटन संघटनेने 'पर्यटक' या शब्दाची व्याख्या पुढील प्रकारे केली "जे लोक आर्थिक कमाई न

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

करता केवळ आनंदासाठी विशिष्ट प्रदेशात २४ तासांपेक्षा जास्त व एक वर्षापेक्षा कमी काळ घराबाहेर राहुन प्रवास करतात ते पर्यटक होत". पर्यटनामागील आधुनिक माणसाची प्रेरणा वरील भुमिकेचा निर्वाळा देते. त्याचबरोबर इतर विचारवंतांनी देखील पर्यटनावर काही व्याख्या दिलेल्या आहेत. पर्यटन म्हणजे एखाद्या व्यक्तीने आपल्या नियमित स्थानाहून किंवा घरातून बाहेर पडून इतर ठिकाणी जात, त्या ठिकाणाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक, नैसर्गिक, आणि सामाजिक वैशिष्ट्यांचा अनुभव घेणे. पर्यटन ही एक तात्पुरती क्रिया असते जी विशिष्ट वेळेसाठी केली जाते. जॉन सॅम्युअल हॉलिडे (John Samuel Holiday) यांनी 'पर्यटन' म्हणजे एक जागतिक प्रवास असून त्यामध्ये स्थानिक संस्कृती, इतिहास आणि जीवनशैलीचा साक्षात्कार होतो. युनायटेड नेशन वर्ल्ड टुरिझम ऑर्गनायझेशन (UNWTO) "पर्यटन हा एक सामाजिक, सांस्कृतिक, आणि आर्थिक क्रिया आहे, ज्यामध्ये लोक विश्रांती, मनोरंजन, काम, किंवा इतर कारणांसाठी त्यांच्या घरापासून इतर ठिकाणी जातात." "तिळे, महेश यांनी एकटे किंवा समूहाने, घर आणि कामाच्या जागे व्यतिरिक्त दूर राहून तेथील गोष्टींचा आनंद घेणे व वापर करणे, तिथंपर्यंत प्रवास करणे, तेथील खाणं-पिणं-राहणं, मनोरंजन, खरेदी, तेथील स्थानिकांशी संवाद-भेटीसाठी घेणं, तसेच यामध्ये समाविष्ट असणाऱ्या सर्व घटना, आपण केलेलं नियोजन व आपली योजना, संपर्कात येणाऱ्या संस्था व उद्योग, या सर्वांच्या एकूण सहभाग व समावेशातून आपल्याला मिळणारा अनुभव (experience) किंवा अनुभवांची शृंखला म्हणजे पर्यटन." या व्याख्यांमध्ये पर्यटनाला विविध अंगांनी समजावून दिले गेले आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आवडी-निवडीच्या आधारावर पर्यटनाचा अनुभव वेगवेगळा असू शकतो. आधुनिक काळातील पर्यटकांच्या वर्गात विविध उद्देशांनी प्रवास करणाऱ्यांचा अंतर्भाव होतो. मुख्यतः पर्यटन काळ हा मर्यादित असतो. आठवड्यातील सुट्या रजा तसेच एखाद्या कार्याचा वा कार्यक्रमाचा भाग म्हणून नियोजित काळात पर्यटन केले जाते. पर्यटक हे उत्प्रावासी व आप्रवासी आणि स्थलांतर करणारे मजूर यांपेक्षा वेगळे असतात. आधुनिक अर्थशास्त्रिय परिभाषेत पर्यटक हा सामान्यतः ग्राहक वा उपभोक्ता समजला जातो तो उत्पादक नसतो. पर्यटनाचे क्षेत्र आंतरदेशिय तसेच आंतरराष्ट्रीय असते जुन्या पर्यटन स्थळांची व्यवस्था राखणे व नविन पर्यटन स्थळे विकसित करणे ही पर्यटन उद्योगाची महत्वाची अंगे होत. आधुनिकपूर्व काळात पर्यटनाची उद्दिष्टे प्राधान्याने धार्मिक व्यापारी व विद्याध्यनात्मक असत.

आर्थिक विकास हा एक बहुआयामी प्रक्रिया आहे ज्यामध्ये विविध उद्योग, क्षेत्र आणि सेवा एकत्रितपणे देशाच्या आर्थिक वृद्धीला चालना देतात. त्यामध्ये पर्यटन हा एक महत्त्वपूर्ण आणि प्रभावशाली घटक आहे. पर्यटन केवळ एका देशाची सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि नैतिक विविधता प्रदर्शित करत नाही, तर तो देशाच्या आर्थिक विकासात मोठा योगदान देतो. पर्यटन उद्योगाने जगभरातील अनेक देशांच्या जीडीपीमध्ये महत्त्वपूर्ण स्थान निर्माण केले आहे. त्याचबरोबर, तो रोजगार निर्मिती, विदेशी चलनाची कमाई, क्षेत्रीय विकास आणि इतर व्यावसायिक क्षेत्रांना उत्तेजन देतो. पर्यटन क्षेत्राचे योगदान आर्थिक विकासात विविध प्रकारे होऊ शकते. हे पर्यावरण, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक घडामोडींमध्ये मोठे योगदान देत असते. पर्यटनामुळे रोजगाराची निर्मिती होते, स्थानिक व्यापार व उद्योगांना चालना मिळते, पायाभूत सुविधांच्या सुधारणांसाठी निधी मिळतो आणि विदेशी चलनाचा पुरवठा होतो, जे एक राष्ट्राचे आर्थिक आरोग्य मजबूत करण्यासाठी महत्त्वाचे आहे. पर्यटन हा जागतिक पातळीवर अर्थव्यवस्थेचा एक प्रमुख घटक बनला असून, तो स्थानिक व्यवसायांना चालना आणि आर्थिक विकासात मोठी भूमिका बजावतो. मराठवाड्यातील पर्यटनाचा अभ्यास केल्यास असे आढळते की, योग्य पद्धतीने नियोजन आणि विकास केल्यास हा भाग महाराष्ट्राच्या पर्यटन नकाशावर आणखी प्रभावीपणे अधोरेखित होऊ शकतो. मराठवाडा हा महाराष्ट्राच्या दक्षिण-पूर्व भागातील एक ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचा प्रदेश आहे. याचा समावेश पूर्वीच्या हैदराबाद संस्थानात होत होता आणि १७ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय संघराज्यात विलीन झाला. याला ऐतिहासिक वारसा, विविध संस्कृती आणि लढवय्या परंपरा लाभली आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

संशोधन विषयाची निवड:

मराठवाडा हा तुलनेने औद्योगिकदृष्ट्या मागासलेला आणि वारंवार दुष्काळग्रस्त असलेला प्रदेश आहे. येथील अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषी व कृषीआधारित उद्योगांवर अवलंबून आहे. त्यामुळे या भागाचा आर्थिक विकास अधिक स्थिर करण्यासाठी विविध पर्यायांचा शोध घेणे आवश्यक आहे.

पर्यटन हा एक असा महत्त्वाचा पर्याय आहे जो स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती, लघु व मध्यम उद्योगांना चालना, तसेच सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे संवर्धन यात महत्त्वाची भूमिका निभावू शकतो. या दृष्टीने प्रस्तुत संशोधनासाठी "मराठवाड्यातील आर्थिक विकासात पर्यटन क्षेत्राचे योगदान : एक अभ्यास" या विषयाची निवड करण्यात आली आहे.

उद्दिष्टे :

१. मराठवाड्यातील प्रमुख पर्यटन क्षेत्रांचा अभ्यास करणे.

२. पर्यटनाच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती आणि लघुउद्योगांना मिळणाऱ्या संधींचा अभ्यास करणे.

३. मराठवाड्यातील पर्यटन क्षेत्राच्या वाढीसाठी आवश्यक धोरणात्मक सुधारणा सुचवणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तूत "मराठवाड्याच्या आर्थिक विकासात पर्यटन क्षेत्राचे योगदान: एक अभ्यास" या संशोधन विषयामध्ये द्वितीयक साधन सामग्री चा आढावा घेण्यात येणार आहे.

द्वितीयक साधन सामग्री :

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीयक साधन सामग्री मध्ये प्रामुख्याने प्रकाशित व अप्रकाशित संशोधन प्रबंध, विविध पुस्तके, वार्षिक प्रकाशने,लेख,इ.चा आधार घेण्यात येईल.

मराठवाड्याचा इतिहास

प्राचीन काळ : मराठवाड्याचा इतिहास प्राचीन काळापासून आढळतो. हा प्रदेश सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव राजवंशांच्या अधिपत्याखाली होता. अजिंठा-वेरूळच्या लेण्या (२ री ते ७ वी शतक) आणि धाराशिव (उस्मानाबाद) येथील लेण्या हा तत्कालीन बौद्ध आणि जैन संस्कृतीचा पुरावा देतात.

मध्ययुग : १३ व्या शतकात दिल्ली सल्तनत आणि नंतर बहमनी आणि निजामशाहीच्या अधिपत्याखाली हा प्रदेश आला. पुढे १७ व्या शतकात शिवाजी महाराजांनी या भागात मराठा सत्ता प्रस्थापित केली. मराठ्यांच्या काळात मराठवाड्यात अनेक किल्ले बांधले गेले आणि प्रशासनिक व्यवस्था सुधारली.

मुघल आणि निजामशाही काळ : औरंगजेबाने औरंगाबाद हे आपले मुख्यालय बनवले आणि येथूनच मराठ्यांविरुद्ध युद्धे लढली. पुढे, औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी मराठवाड्यात पुन्हा आपले वर्चस्व प्रस्थापित केले. मात्र, १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात हा प्रदेश हैदराबादच्या निजामाच्या ताब्यात गेला आणि १९४८ पर्यंत निजामशाहीच्या अखत्यारीत राहिला. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला, परंतु हैदराबाद संस्थान स्वतंत्र राहण्याचा प्रयत्न करीत होते. भारत सरकारने १७ सप्टेंबर १९४८ रोजी "ऑपरेशन पोलो" अंतर्गत हैदराबाद संस्थानावर नियंत्रण मिळवले आणि मराठवाड्याचा भारतात समावेश झाला. पुढे १९५६ साली

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

भाषावार प्रांतरचनेनुसार मराठवाडा महाराष्ट्रात विलीन करण्यात आला. मराठवाड्याचा हा ऐतिहासिक प्रवास त्याच्या सांस्कृतिक समृद्धीचे आणि राजकीय संघर्षांचे प्रतिबिंब दर्शवतो.

मराठवाड्यातील प्रमुख पर्यटन क्षेत्रे

मराठवाडा हा महाराष्ट्रातील ऐतिहासिक, धार्मिक आणि नैसर्गिक पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेला भाग आहे. येथे जागतिक वारसा स्थळांपासून ते धार्मिक आणि पर्यावरण पर्यटनासाठी देखील महत्त्वाची स्थळे आहेत.

ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पर्यटन

अजिंठा लेणी (औरंगाबाद) - अजिंठा (२री ते ७वी शतक) बौद्ध भिक्षूंनी कोरलेल्या गुहा असून युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट आहेत. अजिंठा लेणी, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) : इ.स. पूर्व दुसऱ्या शतकापासून ते इ.स. सातव्या शतकापर्यंतच्या कालखंडात बौद्ध भिक्षूंनी या विस्तीर्ण गुहा कोरल्या आहेत. प्राचीन स्थापत्य आणि उत्कृष्ट चित्रकलेचा नमुना असलेल्या या लेण्यांचा युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून गौरव केला आहे.

बीबी का मकबरा (औरंगाबाद) - ताजमहलच्या धर्तीवर बांधला गेलेला हा मकबरा औरंगजेबाच्या पत्नीची समाधी आहे. आग्रा येथील जगप्रसिद्ध ताजमहालच्या धर्तीवर बांधली गेलेली ही भव्य वास्तू असून, हा मकबरा मुघल सम्राट औरंगजेबाची पत्नी 'रबिया-उद-दौराणी' (दिलरास बानू बेगम) हिचे थडगे (समाधी) आहे. या वास्तूला 'दख्खनचा ताजमहाल' म्हणूनही ओळखले जाते.

दौलताबाद किल्ला (औरंगाबाद) :- दौलताबादचा किल्ला, ज्याला देवगिरी किल्ला असेही म्हणतात, हा महाराष्ट्रातील छ. संभाजीनगर जिल्ह्या मधील, दौलताबाद गावात स्थित एक ऐतिहासिक किल्ला आहे. ही यादव घराण्याची राजधानी होती (९ वे शतक-14वे शतक CE), थोड्या काळासाठी दिल्ली सल्तनतची राजधानी (1327-1334), आणि नंतर अहमदनगर सल्तनतची (1499-1636) दुय्यम राजधानी.भारतातील प्रबळ किल्ला व ऐतिहासिक महत्त्व असलेला किल्ला आहे. याची भक्कम बांधणी आणि चातुर्याने बनवलेली संरक्षण यंत्रणा आहे.

तुळजा भवानी मंदिर (धाराशिव) :- महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांपैकी श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तीपीठ आहे.. छत्रपती शिवाजी महाराज या मंदिरात नेहमी येत असत. कारण छत्रपती शिवाजी महाराजांची ही कुलस्वामिनी होय .

तख्त सचखंड गुरुद्वारा (नांदेड) :- तख्त सचखंड श्री हुजूर अबचलनगर साहिब नांदेडचे मुख्य गुरुद्वारा आहे आणि ते शिखांच्या अधिपत्याखालील पाच उच्च जागांपैकी एक आहेत. हे असे स्थान आहे जेथे श्री गुरु गोबिंदसिंगजींनी आपला शेवटचा श्वास घेतला. नांदेड शहरात गुरुद्वारा आहे. गुरुद्वाराची निर्मिती पंजाबचे महान शासक महाराज रणजितसिंहजींनी 1830 ते 1891 दरम्यान बांधले.

औंढा नागनाथ मंदिर (हिंगोली) :- औंढा नागनाथ मंदिर हे महाराष्ट्रातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले औंढा नागनाथ हे हिंगोली जिल्ह्यातील पवित्र तीर्थक्षेत्र आहे. यालाच 'अष्टम ज्योतिर्लिंग श्री नागेश्वर ज्योतिर्लिंग' असे म्हणतात.

माहूरगड - रेणूकामाता (नांदेड) :- देवीच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी एक मूळ जागृत पीठ म्हणजे, माहूरची श्री रेणुकामाता होय. देवीचे मंदिर १३ व्या शतकात देवगिरीच्या यादवकालीन राजाने बांधले आहे असे म्हटले जाते. माहूरगडावरच श्री दत्तात्रयांचा जन्म झाला अशी भाविकांची श्रद्धा आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

मराठवाड्यातील पर्यटन: स्थानिक रोजगार आणि अर्थव्यवस्थेवरील प्रभाव

मराठवाडा हा ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाने नटलेला प्रदेश आहे. येथील पर्यटन क्षेत्र केवळ पर्यटकांना आकर्षित करत नाही, तर या भागातील ग्रामीण आणि शहरी अर्थव्यवस्थेला बळकट करणारा एक मुख्य आर्थिक कणा (Economic Backbone) बनला आहे. या क्षेत्राचा स्थानिक रोजगार आणि अर्थव्यवस्थेवर झालेला सविस्तर परिणाम खालील मुद्द्यांच्या आधारे समजून घेता येईल:

१. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती (Employment Generation)

पर्यटन क्षेत्र हे मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची गरज असणारे (Labor-Intensive) क्षेत्र आहे. यामुळे मराठवाड्यातील हजारो तरुणांना व स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत:

- **पर्यटन मार्गदर्शक (Tour Guides):** अजिंठा लेणी, दौलताबाद किल्ला आणि बीबी का मकबरा यांसारख्या ऐतिहासिक ठिकाणी इतिहास आणि भाषेचे ज्ञान असणाऱ्या स्थानिक तरुणांना 'गाईड' म्हणून मोठा रोजगार मिळाला आहे.
- **हॉटेल आणि आदरातिथ्य क्षेत्र (Hospitality Sector):** छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि तुळजापूर या प्रमुख केंद्रांमध्ये हॉटेल्स, लॉज, रिसॉर्ट्स आणि रेस्टॉरंट्समुळे शेकडो स्थानिकांना मॅनेजर, शेफ, वेटर्स आणि हाऊसकिपिंग कर्मचारी म्हणून काम मिळाले आहे.
- **वाहतूक क्षेत्र (Transportation):** ट्रॅव्हल एजन्सी, टॅक्सी चालक, ऑटो रिक्षा चालक आणि स्थानिक बस सेवा यांना पर्यटकांमुळे बारमाही व्यवसाय मिळतो. विशेषतः विमानतळ आणि रेल्वे स्टेशन ते पर्यटन स्थळांपर्यंतची वाहतूक स्थानिक अर्थव्यवस्था गतिमान ठेवते.

२. धार्मिक पर्यटनातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती (Religious Tourism & Rural Economy)

मराठवाड्यातील धार्मिक स्थळे जसे की, तुळजापूरचे तुळजाभवानी मंदिर, माहूरगड, औंढा नागनाथ

आणि नांदेडचा सचखंड गुरुद्वारा येथे वर्षभर लाखो भाविकांची ये-जा असते:

- **स्थानिक बाजारपेठांचा विकास:** मंदिरांच्या परिसरात पूजा साहित्य, फुले, पेढे, प्रसाद, बांगड्या आणि धार्मिक वस्तूंची हजारो लहान-मोठी दुकाने चालतात. यामुळे ग्रामीण भागातील महिला व छोट्या व्यापाऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळते.
- **हंगामी व्यवसाय:** नवरात्र उत्सव, चैत्र पौर्णिमा, महाशिवरात्री आणि गुरुतागद्दी सोहळा यांसारख्या मोठ्या उत्सवांच्या काळात कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल होते, ज्यामुळे स्थानिक प्रशासनाचा महसूलही वाढतो.

३. हस्तकला, कुटीर उद्योग आणि स्थानिक उत्पादनांना चालना (Art & Handicrafts Promotion)

पर्यटनामुळे मराठवाड्यातील पारंपरिक कला आणि उद्योगांना जागतिक बाजारपेठ मिळाली आहे:

- **पैठणी आणि हिमरू शाली:** छत्रपती संभाजीनगरमध्ये येणारे पर्यटक प्रसिद्ध 'पैठणी साडी' आणि 'हिमरू शाल' आवर्जून खरेदी करतात. यामुळे स्थानिक विणकर आणि हस्तकला कारागिरांच्या हाताला काम मिळते.
- **स्थानिक कृषी उत्पादने:** पर्यटन क्षेत्रांच्या आसपास स्थानिक फळे (उदा. जालना-संभाजीनगरची मोसंबी, केशर आंबा) आणि खाद्यपदार्थांची विक्री वाढून शेतकऱ्यांना थेट बाजाराचा फायदा होतो.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

४. पायाभूत सुविधांचा विकास (Infrastructure Development)

पर्यटनाच्या वाढत्या विकासामुळे शासनाकडून मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर निधी आणि पायाभूत

सुविधा पुरवल्या जात आहेत:

- **रस्ते आणि कनेक्टिव्हिटी:** 'समृद्धी महामार्ग' आणि पर्यटन स्थळांना जोडणारे दर्जेदार रस्ते यामुळे वाहतूक सुलभ झाली आहे, ज्याचा फायदा स्थानिक व्यापारालाही होत आहे.
- **नागरी सुविधा:** पर्यटन स्थळांचा विकास करताना पाणीपुरवठा, वीज, स्वच्छता आणि हॉटेल उद्योगाचा विकास झाल्याने संबंधित भागातील जमिनींचे मूल्य (Real Estate Value) वाढले आहे.

५. परकीय चलनाची कमाई आणि एकत्रित आर्थिक परिणाम (Foreign Exchange & GDP)

- अजिंठा लेण्यांसारख्या जागतिक वारसा स्थळांना भेट देण्यासाठी दरवर्षी हजारो परदेशी पर्यटक येतात. त्यांच्याकडून मिळणाऱ्या प्रवेश शुल्कातून आणि खर्चामुळे देशाला आणि राज्याला **परकीय चलन (Foreign Exchange)** मिळते.
- पर्यटनातून निर्माण होणारा पैसा हा स्थानिक बाजारपेठेतच फिरत राहिल्यामुळे (Multiplier Effect) मराठवाड्याच्या 'जीडीपी' (GDP) मध्ये या क्षेत्राचा वाटा अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे.

निष्कर्ष (Conclusion)

प्रस्तुत संशोधन अभ्यासावरून मराठवाड्यातील पर्यटन क्षेत्राचे स्थानिक अर्थव्यवस्था आणि

रोजगारावरील प्रभावाबाबत खालील निष्कर्ष काढण्यात आले आहेत:

- **आर्थिक परिवर्तनाचा मुख्य स्त्रोत:** मराठवाडा हा प्रामुख्याने दुष्काळग्रस्त आणि कृषीआधारित प्रदेश आहे. अशा परिस्थितीत पर्यटन क्षेत्र हे या भागातील औद्योगिक मागासलेपणावर मात करून आर्थिक स्थैर्य देणारा एक महत्त्वाचा **पर्यायी आर्थिक स्त्रोत** म्हणून उदयास आले आहे.
- **मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती:** अजिंठा-एलोरा सारखी जागतिक वारसा स्थळे आणि तुळजापूर-माहूर सारख्या धार्मिक क्षेत्रांमुळे स्थानिक स्तरावर वाहतूक, आदरातिथ्य (Hotels & Hospitality), मार्गदर्शक (Guides) आणि किरकोळ व्यवसाय क्षेत्रांत **थेट व अप्रत्यक्ष रोजगार** मोठ्या प्रमाणात निर्माण झाला आहे.
- **स्थानिक संस्कृती आणि हस्तकलेला ऊर्जितावस्था:** पर्यटनाच्या वाढीमुळे पैठणी, हिमरू शाली, स्थानिक कलाकुसर आणि पारंपरिक खाद्यपदार्थांच्या बाजारपेठेला जागतिक ओळख मिळाली आहे, ज्यामुळे स्थानिक कारागिरांचे उत्पन्न वाढले आहे.
- **पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा:**

  पर्यटन विकासामुळे मराठवाड्यातील रस्ते विकास, विमानतळ कनेक्टिव्हिटी आणि नागरी

  सुविधांमध्ये वेगाने सुधारणा झाली आहे, ज्याचा फायदा इतर व्यावसायिक क्षेत्रांनाही होत आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

- **पर्यटनाचे असंतुलित केंद्रीकरण:** अभ्यासाअंती असे दिसून येते की, पर्यटकांचा ओघ प्रामुख्याने छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) या एकाच जिल्ह्याभोवती जास्त केंद्रित आहे, तर हिंगोली, जालना आणि बीड यांसारख्या इतर जिल्ह्यांतील पर्यटन स्थळांचा विकास अजूनही अपूर्ण आहे.

शिफारशी (Recommendations)

मराठवाड्यातील पर्यटन क्षेत्राचा पूर्ण क्षमतेने विकास करून प्रादेशिक आर्थिक वृद्धी गतीमान

करण्यासाठी खालील उपाययोजना करणे गरजेचे आहे:

- **एकत्रित पर्यटन सर्किट (Integrated Tourism Circuit) विकसित करणे:** मराठवाड्यातील ऐतिहासिक, धार्मिक आणि नैसर्गिक स्थळांना जोडून एक 'मेगा पर्यटन सर्किट' तयार करावे. (उदा. छत्रपती संभाजीनगर - जालना - हिंगोली - नांदेड - लातूर - धाराशिव). यामुळे पर्यटकांचा मुक्काम वाढेल आणि सर्व जिल्ह्यांचा समतोल विकास होईल.
- **कौशल्य विकास आणि प्रशिक्षण:** स्थानिक तरुणांसाठी पर्यटन मार्गदर्शक (Guides), हॉटेल व्यवस्थापन, डिजिटल मार्केटिंग आणि परदेशी भाषांचे मोफत प्रशिक्षण देणारे केंद्र सुरू करावे, जेणेकरून स्थानिकांना दर्जेदार रोजगार मिळेल.
- **डिजिटल ब्रँडिंग आणि मार्केटिंग:** जागतिक स्तरावर मराठवाड्याच्या पर्यटनाचा प्रचार करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने (MTDC) सोशल मीडिया, ट्रॅव्हल ब्लॉग्स आणि आंतरराष्ट्रीय महोत्सवांच्या माध्यमातून आधुनिक डिजिटल मार्केटिंगवर भर द्यावा.
- **धार्मिक पर्यटन स्थळांवर आधुनिक सुविधांची निर्मिती:** तुळजापूर, माहूर आणि औंढा नागनाथ यांसारख्या ठिकाणी वर्षभर येणाऱ्या भाविकांसाठी स्वच्छता, निवास व्यवस्था, पार्किंग आणि ऑनलाईन दर्शन पासेसची यंत्रणा अधिक सुटसुटीत व अद्ययावत करावी.
- **कृषी आणि इको-टुरिझम (Eco-Tourism) ला प्रोत्साहन:** मराठवाड्यातील धरणांचे जलाशय (उदा. जायकवाडी), जलप्रपात आणि जंगलांच्या भागात पर्यावरणपूरक पर्यटन तसेच शेती पर्यटन (Agri-Tourism) केंद्र उभारण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात कर्ज व अनुदान उपलब्ध करून द्यावे.
- **सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP Model):** ऐतिहासिक वास्तूंच्या जतनासाठी आणि पर्यटन क्षेत्रांजवळ जागतिक दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यासाठी नामांकित खाजगी कंपन्यांची मदत (Corporate Social Responsibility - CSR) आणि गुंतवणूक आकर्षित करावी.

संदर्भ:

१. UNWTO (2023). Tourism and Economic Development Report. United Nations World Tourism Organization.

२. Kulkarni, R. (2019). Tourism Potential in Marathwada: A Geographical Analysis. Pune University.

३. Smith, M. & Richards, G. (2020). The Economic Impact of Tourism: Global and Regional Perspectives. Oxford University Press.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

४. Maharashtra Tourism Development Corporation (MTDC) Reports (2022)

५. Gokhale, B.G. (1988). Ancient India: History and Culture. Oxford University Press.

६. Sardesai, G.S. (1957). New History of the Marathas. Phoenix Publications.

७. Kamath, S. (1980). A Concise History of Karnataka. Archana Publications.

८. Jain, R.K. (1998). Hyderabad: Liberation and Integration. South Asia Books.

९. Samuelson, P. A. (1957). Economics: An Introductory Analysis. McGraw-Hill.

१०. Todaro, M. P., & Smith, S. C. (2000). Economic Development. Pearson.

११. Sen, A. (1999). Development as Freedom. Oxford University Press.

१२. तिळे, महेश. (२०१८). पर्यटन म्हणजे काय?: https://paryatanvishwa.com/what-is-tourism/

१३. Kulkarni, R. (2018). Heritage Tourism in Maharashtra. Pune University.

१४. वाघ, किरण. (२०२०). सांस्कृतिक व धार्मिक पर्यटनाचा विकास.

१५. पाटील, शिवाजी. (२०१६). पर्यटन उद्योगाचा सामाजिक परिणाम.